# CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.

Old Power House Premises, Dr. Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


No:- CGRF/AZ/AUR/JLN / 549 / 2015 / 12 Date :-

To,

01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Circle, M.S.E.D.C.L.,
JALNA.

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Shri Ramrao Laxmanrao Shinde,At Post Bawne Pangari,Tq Badnapur Dist Jalna
(Consumer No. 510350226557 )

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum, in respect of Shri Ramrao Laxmanrao Shinde,At Post Bawne Pangari, Tq Badnapur Dist Jalna

You are requested to redress the grievance or submit Para wise reply for interim on 24.02.2015 at 12.00 Hour.

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

Encl: As above
Shri Ramrao Laxmanrao Shinde,
At Post Bawne Pangari,
Tq Badnapur Dist Jalna

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना / ५४९ /२०१५/ १२

**तक्रार दाखल दिनांक :- ०७.०२.२०१५**
**निकाल दिनांक :- २४.०३.२०१५**

**श्री.रामराव लक्ष्मनराव शिन्दे — तक्रारदार**
**मु.पोस्ट बावनापांगरी**
**ता.बदनापुर , जिल्हा जालना**

**विरुध्द**

**कार्यकारी अभियंता ( प्रशासन ), — गैरअर्जदार**
**ग्रामिण विभाग,नोडल ऑफिस,**
**म.रा.वि.वि.कं.म. जालना.**

**मंच सदस्य**

| | |
|---|---|
| **डॉ. भास्कर गो.पालवे,** | **अध्यक्ष** |
| **श्री. नामदेव आर गांधले,** | **सदस्य / सचिव** |
| **श्री. विलासचंद्र सु. काबरा,** | **सदस्य** |

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निर्णय –**

अर्जदार श्री. रामराव लक्ष्मणराव शिंदे मु.पो. बावने पांगरी ता. बदनापुर जिल्हा जालना ( ग्राहक क्रमांक ५१०३५०२२६५५७ ) यांनी दिनांक ०२.०२.२०१५ रोजी कार्यकारी अभियंता ( प्रशासन ),नोडल ऑफिसर, जालना मंडल, महावितरण, जालना तथा गैरअर्जदार यांचे विरुध्द तक्रार अर्ज महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विदयुत लोकपाल ) विनीयम २००६ च्या असूसुची अ या नमुन्यात केला आहे सदर अर्जातील तक्रारीचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

१ ) अर्जदाराने त्यांचे दिनांक ०२.०२.२०१५ च्या पत्रानुसार आपले म्हणणे सादर केले आहे .ग्राहकाचा विदयुत पुरवठा ज्या रोहित्रावरुन ( डि.पी ) आहे ते रोहित्र ( डि.पी ) जळाल्यामुळे विदयुत पुरवठा दिनांक २१.०८.२०१४ पासुन २६.०९.२०१४ पर्यन्त खंडीत झाला होता. त्यानंतर ३०.०९.२०१४ रोजी झालेल्या नुकसान भरपाईचा अर्ज मा.उपविभागीय अधिकारी तथा उप-कार्यकारी अभियंता , महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित मस्तगड, जुना जालना, जि. जालना यांचेकडे महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग , मुंबई यांनी महाराष्ट्र विदयुत भरपाई निश्चीतीकरीता विनीयम २००५ च्या कलम १२.१ नुसार परिशिष्ट ( अ ) मध्ये केलेल्या तरतुदीनुसार भरपाई मिळावी म्हणून अर्ज केला.माझ्या अर्जावर संबधित कर्मचारी / अधिकारी कार्यवाही केली नाही. त्यामुळे दिनांक ०७.११.२०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केला परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही.त्यामुळे दिनांक ०२.०२.२०१५ रोजी मंचाकडे अर्ज सादर केला .ग्राहकाने ८७२ तास + २२० तास = १०९२ तास विदयुत पुरवठा विलंबाने सुरु केल्यामुळे महाराष्ट्र राज्य विदयुत आयोगाचे विनीमय २००५ च्या कलम १२.१ मधील परिशिष्ट अ नुसार रुपये ५२,२००/- नुकसान भरपाई मिळावी.

२ ) <u>कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) महावितरण, जालना तथा गैरअर्जदार यांचे म्हणणे</u>

गैरअर्जदार यांनी त्यांचे दिनांक ०७.०२.२०१५ चे पत्रानुसार आपले म्हणणे सादर केलेले आहे. त्यानुसार महावितरणचे मुख्यालयाने निर्गमित केलेल्या परिपत्रक १३६ संचालक ( ऑप ) / परिपत्रक / १३६ अ दि. ०५.११.२०११ व संचालक ( सं ) पत्र क्रमांक ३३३९९ दि.०८.११.२०११ नुसार रोहित्र नादुरुस्त झाल्यानंतर त्या रोहित्रावरील एकूण ग्राहकापैकी ८० टक्के थकबाकीचा भरणा केल्यानंतर रोहित्र बदलून देण्यात येत होते. प्रस्तुत रोहित्रावर एकुण ३१ ग्राहक आहेत व त्याची एकूण थकबाकी रु.१४,९८,१५०/- इतकी आहे . एवढी थकबाकी असतांना देखील दि. २६.०९.२०१४ पर्यन्त ग्राहकांनी रु. १७,०२०/- थकबाकीचा भरणा केला

असतांना सुध्दा ग्राहकांना रोहित्र बदलून विदयुत पुरवठा सुरु करण्यात आला. महावितरण यांनी नियमानुसार कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे महावितरण कोणतीही नुकसान भरपाई देण्यास बांधील नाही.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निष्कर्ष</u>**

अर्जदार व गैरअर्जदार यांनी सुनावणी दरम्यान सादर करण्यात आलेले तोंडी व लेखी म्हणणे विचारात घेता मंच खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आदेश

१ ) अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२ ) जे ग्राहक नियमितपणे विज देयकाचा भरणा करतात. त्यांचा विज पुरवठा लवकरात लवकर सुरु करण्याचा प्रयत्न गैरअर्जदाराने करावा.

३ ) अर्ज कोणत्याही आर्थिक भरपाई शिवाय निकाली काढण्यात येत आहे.

४ ) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | विलासचंद्र. सु. काबरा | नामदेव रा.गांधले |
| अध्यक्ष | सदस्य | सदस्य/सचिव |

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/ जालना / ५४९ /२०१५ /१२ / दिनांक :-

प्रति,
श्री. रामराव लक्ष्मनराव शिन्दे,
मु.पो. बावने पांगरी,
ता. बदनापुर जिल्हा. जालना.
ग्राहक क्रमांक ५१०३५०२२६५५७

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/जालना /५४९/२०१५/१२)

आपण दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

प्रति,सविनय सादर
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रति,
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. मंडळ कार्यालय, जालना
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
प्लॅाट नं १२,शिवकृपा, विजयनगर,छावणी,
नागपुर ४४००१३
फोन नं. (०७१२)२०२२१९८ - E-mail – cgrfnz@gmail.in /
sectretaryombudsmannagpur@gmail.com